B.P.H.E. Society's
CSRD- Institute of Social Work and Research
Ahmednagar.
Maharashtra.
Conference Paper Presentation

विद्यार्थ्याचे नाव- शिवाजी सुरेश गवारे
वर्ग- एम. एस. डब्ल्यू.(द्वितीय वर्ग)
पर्यवेक्षक- सहा. प्रा. विजय संसारे.

शोष निबंध शिर्षक :

शिरापूर समुदयात युवकांमध्ये जनजागृति व समुपदेशन.

गोषवारा (Abstract) :

समाजकार्य पदवित्तर शिक्षण घेत असलेले प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्यांनी समाजकार्य पदवित्तर अभायक्रमाअंतर्गत क्षेत्रकार्य करणे आवश्यक असते त्या नुसार सी. एस .आर .डी व समाजकार्य संशोधन संस्था प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्ते शिवाजी सुरेश गवारे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे अंतर्गत द्वितीय वर्षात समाजकार्य पदवित्तर अभ्यासक्रम अंतर्गत अंतिम क्षेत्रातील क्षेत्र कार्य अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शिरापूर या ग्रामीण समुदायात क्षेत्रकार्य केले.

कोविड- १९ मुळे जगभरात याचा परिणाम दिसून आला आहे तसेच समुदायातील लोकांवर पण याचा प्रभाव पडला आहे तसेच समुदायातील युवकांना ही परिणाम दिसून येत आहे.या जागतिक आरोग्य परीसस्थितिला प्रतिसाद म्हणून वेगवेगळा प्रतिबंधात्मकप्रयत्न हाती घेण्यात आले आहे.त्यात लस विकसित करण्यात आघाडीवर आहे.

समाजकार्यकर्त्याला संशोधन करत असताना ज्या समुदायामध्ये कार्यक्रम घेतले त्याच्या त्यांना नक्कीच फायदा झाला तसेच पूर्वीपेक्षा त्यांच्या मनात बदल घडून आले.

प्रस्तावना :

सदर विषयाला अनुसरून विदयार्थी प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्यांनी शिरापूर या समुदयामध्ये कोवीड १९ व लदिकरणाबाबत जनजागृति तसेच समुदायातील युवकांना मार्गदर्शन व मुलांना शैक्षणिक मार्गदर्शन केले.त्याचबरोबर कोरोना काळामध्ये समुदायात आलेल्या अडचणी आणि परीस्थिती पुढील प्रमाणे.

लॉकडाऊन अगोदर :

१) लॉकडाऊन अगोदर गावातील वातावरण हे एकदम खेळीमेळीचे होते तसेच गावातील लोक हे मिळून मिसळून राहायचे.
२) गावातली लोक हे आपल्या दैनंदिन जीवनामध्ये सकाळी उठायचे आणि शेतात कामाला जायचे इतर कामे करत होते हा त्यांचा दररोज चा कामाचा वेळ ठरलेला असायचा
३) लॉकडाऊन च्या अगोदर गावामध्ये कमी प्रमाणात लोक असायचे लोक आपापल्या कामात व्यस्त असायचे आणि गावातील शिक्षित लोक हे बाहेर गावी कामासाठी गेलेले होते
४) लॉकडाऊन च्या अगोदर सन उत्सव यात्रा लग्न समारंभ बाजार बाजारपेठ हे सर्व चालू होते व मोठ्या संख्येने पार पाडत होते
५) गावातली लोक हे सकाळच्या वेळेत मंदिर समाजमंदिर पारावर बसून गप्पा मारत होते म्हणजे कोणत्या प्रकारचे बंधने नव्हती

लॉकडाऊन च्या काळामध्ये :

१) अत्यावश्यक सेवांचा तुटवडा- कोरोना काळामध्ये अत्यावश्यक सेवांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला लोकांना भाजीपाला किराणा तसेच आपल्या दैनंदिन जीवनामध्ये लागणाऱ्या वस्तू मिळाल्या नाही व भाजीपाला किराणा आणला तर तो खाण्यासाठी मनामधे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते

२) शेतीची समस्या- जनता कर्फ्यु मध्ये शेती मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले शेतीमालाला योग्य तो भाव मिळाला नाही शेतीसाठी लागणारे औषधे देखील मिळाले नाही जे औषध उपलब्ध झाले ते जास्त भावामध्ये घ्यावे लागले पाहिजे त्या वेळेवर औषध न भेटल्यामुळे पिक हे वाया गेले ते येऊ शकले नाही त्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

३) रोजगाराची समस्या- लॉकडाऊन च्या काळामध्ये रोजगाराची मोठ्या प्रमाणात समस्या जाणवली कारण सर्व बंद असल्यामुळे रोजगार कुठे उपलब्ध नव्हता आणि खाण्यापिण्यावर तर मोठ्या प्रमाणात खर्च होत होता कारण भाजीपाला हा दुप्पट भावामध्ये घ्यावा लागत होता काही लोकांची अशी परिस्थिती होती की ते काम केल्याशिवाय जगू शकत नव्हते म्हणून घर खर्चासाठी त्यांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागले

४) मुलांच्या शिक्षणावर झालेला परिणाम- सर्व शाळा महाविद्यालये बंद असल्यामुळे मुलांच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला जे मुले शाळेत जात होते त्यांना घरून अभ्यास करावा लागत होता परंतु ऑनलाईन अभ्यासासाठी काही मुलांकडे मोबाईल उपलब्ध नव्हते तसेच रेंज चा पण प्रॉब्लेम होता शेतातील काम असल्यामुळे मुलांना अभ्यासासाठी वेळ भेटत नव्हता.

लॉकडाऊन नंतर :

लॉकडाऊन नंतर सर्व सुरळीत चालू झाले आहे परंतु कोरोना काळामध्ये जे नुकसान झाले आहे ते परत आणता येणार नाही सध्याच्या काळामध्ये लोकडाऊन जरी संपले असेल तरी लोक एकमेकांच्या संपर्कात येण्यासाठी टाळतात आणि मास्क चा वापर करतात आणि गावामध्ये जे मुंबई पुण्या चे लोक आले होते ते आपल्या अगोदर च्या ठिकाणी गेलेले दिसून येते तसेच मंदिरे, बाजारपेठ,शाळा, पंचायत समिती, व ईतर सर्व गोष्टी पूर्णपणे चालू झाल्या आहेत आणि कोणत्याही प्रकारची बंधने नाहीत आणि लग्न समारंभ मंदिरे हे पहिल्यासारखे चालू झाले आहेत
अशा प्रकारे विदयार्थी प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्याला क्षेत्रकार्य करत असताना जी समुदायात परिसस्थीती निर्माण झाली ती अशा प्रकारे आहे

कार्यपद्धती (Methodology) :

कोविड १९ च्या काळामध्ये प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्याने शिरापुर या ग्रामीण समुदायातील लोकांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे त्याचबरोबर त्यांना आलेल्या अडचणी यावर हा लेख तयार केला आहे.यामध्ये प्रामुख्याने प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्याने शिरापूर या गावातील मुलांच्या शिक्षणावर झालेला परिणाम तसेच कोवीड १९ व लसीकरनाबाबत जनजागृति आणि मुलांना शैक्षणीक मार्गदर्शन करणे हे सगळं मी माझ्या वयक्तिक अनुभवाचा वापर केला आहे व हया सर्व गोष्टी अनुभवल्या आहेत.

१) गावामध्ये प्रथम लसीकरणाची जनजागृति करण्यात आली त्यातून लोकांना संदेश देण्यात आला की लस घेतल्यावर काही परिणाम होत नाही किंवा ताप येत नाही हे सांगण्यात आले.

२) कोरोना ची 3 री लाट यावर देखील काम केले.

३) महिलांचे बचत गट स्थापन केले त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यांना कर्ज वाटप करण्यात आले.

४)गावातील लोकांना कृषी खात्यामार्फत बी बियाणे वाटप करण्यात आले त्यांना मार्गदर्शन केले.

५)गावातील जे अशिक्षित युवक आहेत त्यांना त्यांना शिक्षणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

६)तसेच युवक वर्गाचे फॉर्म भरून घेण्यात आले जेणेकरून त्यांना रोजगार उपलब्ध व्हावा.

प्रशिक्षनार्थी समाजकार्यकर्त्यास आलेली आव्हाने :

1. लोकांचा नकारार्तमक प्रतिसाद

प्रशिक्षणार्थि हा जनजागृती करण्यासाठी गावातील इतर कुटुंबांना भेट देत
आहे यामुळे आपल्यालाही संपर्कात येऊन कोरोना विषाणूची लागण होऊ शकते असा लोकांचा गैसमज निर्माण झाला होता तसेच गावात रुग्णसंख्या जास्त असल्यामुळे लोक इतर व्यक्तींना आपल्या घरी येऊ देत नाही. प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्ताकोरोनाचे सर्व शासकीय नियमांचे पालन करत असूनही लोकांचा समाज कार्यकर्त्याविषयी नकारात्मक दृष्ट्टीकोन असल्याचे निदर्शनास आले.

२. कोरोना परिस्थितीमध्ये काय करणे.

कोरोना महामारीच्या आपत्ती जनक परिसस्थिती मध्ये स्वतः ची व कुटुंबांच्या सुरक्षक्षततेचा विचार करून कार्य करणे हे एक आव्हान होते. तसेच आपल्यामुळे दुसऱ्या व्यक्तीला त्रास होऊ नये याची काळजी घेऊन कार्य करणे एक आव्हान होते.

३. वेळेचे नियोजन

ग्रामीण भाग असल्यामुळे व लोकांचे शेती संबर्धत व्यवसाय असल्यामुळे लोक सकाळी व संध्याकाळी च घरी राहतात यामुळे वेळेचे नियोजन करून उपक्रम घेणे हे प्राशिकक्षणार्थी समाज कार्यकर्त्या पुढे आव्हान होते.

शिकण्यास मिळालेल्या बाबी :

१) समस्या सोडविण्याचे कौशल्य.
२) गटकार्याची कौशल्य विकसित झाले.
३)विवीध गोष्टींना सामोरे जाण्याचे जाण्याचे कौशल्य विकसित झाले.
४)व्यावसायिक कार्याचे व मार्गदर्शनाची तसेच समाज माध्यमांचा वापर करण्याचे कौशल्य विकसित झाले.
५) समाजामध्ये निर्माण झालेल्या नवीन सामाजिक समस्या ओळखणे.
६)समाजकार्याची तत्वे, पद्धती, कौशल्ये, मुल्ये, तंत्र यांचा वापर

समाजकार्य हस्तक्षेपाचा परिणाम :

शिरापुर या समुदायात क्षेत्र कार्य करत असताना विदयार्थी प्रशिक्षणार्थी समाजकार्यकर्त्याने अनेक प्रकारचे आव्हाने स्वीकारली आणि इथून पुढे पण स्वीकारण्याची क्षमता आहे. क्षेत्रकार्य करत असताना समुदायात बदल घडून आले जसे की

1) लोक मास्क चा वापर करायला लागले.

2) त्याचबरोबर सुरक्षित अंतर पाळायला लागले.

3) लासिकरणाविषाई जो गैरसमज होता तो निघून गेला.

4) गर्दीच्या ठिकाणी जाण्यास टाळायला लागले

5),वेळोवेळी sanitaizer चा वापर करायला लागले.

6) शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासासबंधी मार्गदर्शन केल्यामुळे विदयार्थी अभ्यास करत आहे

7)लोकांचे लसीकरणाववषयी असणारे गैरसमज दूर झाल्यामुळे लोक लसीकरण करून घेत आहे.

8) कोरोना विषाणूमुळे प्रभावित झालेल्या कुटुंबास मानसिक आधार देण्याचे काम केल्यामुळे

त्यांचा ताणताणाव कमी होण्यास मदत झाली आहे.

समारोप :

दैनंदिन जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये विवीध प्रकारचे बदल होत असतात. हे बदल मानवनिर्मित किंवा नैसर्गिक असतात. त्यास विविध प्रकारची करणे असू शकतात.

या बदलामुळे मानवी जीवनामध्ये विविध समस्या निर्माण होत असतात अशाच प्रकारे

कोरोना विषाणूमुळे सामाजिक, आथिर्क, नैसर्गिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक समस्या

कोरोना विषाणूमुळे शिरपुर समुदायामध्ये निर्माण झाल्यामुळे प्रशिक्षनार्थी समाजकार्यकरत्याने क्षेत्रकार्य अंतर्गत समुदायात विविध उपक्रम राबवून त्या समस्या सोडविण्याचे काम केले.

संदर्भ सूची :

१)www..who.int सदर ऑनलाईन वेबसाईट वरून करोना वीषाणूवषयी मिाहती प्राप्त करण्यात आलेली आहे.

२) हार्डवर युिनिव्हारसिटी या संके तस्थळाला दिनांक १८ ऑगस्ट२०२० रोजी ५:१० pm वाजता भेट दिली असता या संके तस्थळावर करोना व्हायरस बद्दलल संपूर्ण माहिती दिली आहे

३)BBC.com दिनांक १० ऑगस्ट २०२०, वेळ-२: २४ pm वाजता या संके तस्थळाला भेट दिली असता या संके तस्थळावर करोना विषाणूची नवीन लक्षणे कोणती या विषयी सविस्तर माहिती प्रकिाशत के लेली आहे.

४)तरुणभारत, मुंबई ९ जुलै२०१८ या डॉ.मंदार पाटकर यांनी लेख लिहला. या लेखा मध्ये आजार म्हणजे काय याची संपूर्ण माहिती दिली आहे.

५) महाराष्ट्र शासन या संके तस्थळाला दीनांक १८ ऑगस्ट २०२० रोजी १:४० pm वाजता भेट दिली असता या संके तस्थळावर करोना व्हायरस बद्दल पडलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

६)लोकमत दि.२१ ऑगस्ट २०२० रोजी वृत्तपत्रात महाराष्ट्रामध्ये या आजाराचा काय परिणाम झाला
आहे याची सर्व माहिती दिलेली आहे.